महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट,
३ रा मजला, जे. एन. हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६२२०२९ संकेतस्थळ - www.mahakosh.in
०२२-२२६२६२९१ / २२६२२०३६ ईमेल आयडी aoexamdat.mum-mh@gov.in

क्र.संलेको/परीक्षा-१७/मविलेसे वर्ग-३ परीक्षा/अर्ज स्विकारणेबाबत / ६४ दिनांक :- 22 MAR 2018

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ या
विभागीय परीक्षेकरिता पात्र उमेदवारांचे
अर्ज दि .३१/०३/२०१८ पर्यंत
स्विकारणेबाबत.

परिपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ ही परीक्षा दि. २४ ते २७ एप्रिल २०१८ या दरम्यान घेण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे दि. १९/०३/२०१८ च्या वेळापत्रकानुसार घोषित केले आहे. सदर परीक्षेकरीता दिनांक २४ एप्रिल २०१८ पर्यंत शासन निर्णय क्रमांक डीएटी-१०६४/५८४-स्ती/XII, दि.१.२.१९६५ नियम ६(a)(b) मधील तरतूदीनुसार नव्याने पात्र होणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज कार्यालयाप्रमुखामार्फत या संचालनालयास दि. ३१/०३/२०१८ पर्यंत सादर करावे. दि. ३१ मार्च २०१८ नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

ज्या उमेदवारांनी यापूर्वी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ या विभागीय परीक्षेकरीता अर्ज सादर केले आहेत व ज्या उमेदवारांची नावे दि. ०४/०१/२०१८ व दि.२२/०३/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या अपात्र उमेदवाराच्या यादीत नाहीत अश्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

तसेच महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ या विभागीय परीक्षेस बसण्यास ४० वर्षाची वयोमर्यादा शिथील करण्याबाबत या संचालनालयाकडून २ वेळा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्ताव शासनाने अमान्य केले असल्याने वय ४० वर्षापेक्षा जास्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज या संचालनालयाकडून स्विकारले जाणार नाही.

Desai 23/3/18
(विकास देसाई)
सहसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई.

Scanned by CamScanner

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१) सहसचिव, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, कोषा-प्रशा-३, मंत्रालय, मुंबई.

२) उपसचिव (प-१), महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

प्रत :-

१) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई

२) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.

३) सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे,

४) सर्व कोषागार अधिकारी.

५) सर्व उपकोषागार अधिकारी.

६) संबंधीत इतर कार्यालये

७) निवड नस्ती.

संबंधित कार्यालय प्रमुखांनी या परिपत्रकाची प्रत आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर सूचना फलकावर लावावी. सदर परिपत्रकाची प्रत संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner